बीड । सोमवार
२३.१२.२०२४
वर्षे : ४ अंक : २५६
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक
# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 

# मुंडेच्या अन्नावर मराठ्यांनी वेडा टाकला

## बारामतीत अजित पवारांना डीएम वगळण्याची मागणी

**बारामती, (वृत्तसेवा):-महायुती सरकारचे खातेवाटप शनिवारी संध्याकाळी जाहीर झाले. यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाच, एकनाथ शिंदेंना तीन आणि अजित पवार यांना दोन खाती मिळाला आहे. गृह खातं फडणवीसांनी आपल्याकडे ठेवलं असून अजित पवारांकडे अर्थ खातं कायम आहे तर शिंदेंकडे नगरविकास आणि गृहनिर्माण खाती देण्यात आली आहेत. खातेवाटप जाहीर झाल्यावर राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडेंविरोधात संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून अटक व्हावी आणि हकालपट्टी करण्याची मागणी होत आहे. अजित दादांनी आरोप होत असताना धनंजय मुंडे यांच्याकडे अन्न व नागरी पुरवठा खात्याची जबाबदारी दिली आहे. मात्र आता हालचाली वाढू लागल्या असून धनंजय मुंडेंची अडचण होऊ शकते.**





बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग मध्ये सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी गुन्हेगारांचा नेता म्हणून धनंजय मुंडे यांची तात्काळ हकालपट्टी करून त्यांना अटक करावी अशी मागणी मराठा बांधवांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे. याबाबतचे एक निवेदन समाजाच्या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिले आहे. संतोष देशमुख हे मराठा समाजाचे आहेत आणि त्यांचा सर्वात मोठा अडसर मंत्री धनंजय मुंडे यांना होता. त्यामुळेच परळीत त्यांची आपल्या मंत्रिमंडळातील नेत्याने वाल्मीक कराड यांच्यामार्फत देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली आहे. आपल्या मंत्रिमंडळातील धनंजय मुंडे हे गुन्हेगारांचे नेते आहेत म्हणून त्यांची मंत्रिमंडळातून तात्काळ हकालपट्टी करावी आणि त्यांना तातडीने अटक करावी अशी मागणी केली आहे. बीडमध्ये संतोष देशमुख यांच्या परिवाराची भेट घ्यायला गेलेल्या अजित पवारांना तिथल्या ग्रामस्थांनी धनंजय मुंडे मंत्रिपद देऊ नये अशी घोषणाबाजी केल्याचं पाहायला मिळालं होतं. अजित पवार यांनी या प्रकणातील आरोपींवर कारवाई करण्याची ग्वाही देशमुख कुटुंबियांना दिली. मात्र त्यांनी ग्रामस्थांनी कोणतीही चर्चा केली नाही. त्यामुळे ग्रामस्थांनी यावरून संताप व्यक्त करत भेट घ्यायला नसते आले तरी चाललं असतं अशी संतप्र प्रतिक्रिया दिली.

# स्व.संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी सर्व पक्ष,समाज आणि संघटना एकत्र येणार

## आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी आज सामूहिक बैठक



बीड,(प्रतिनिधी):- केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांची अमानवीय पध्दतीने निघृण हत्त्या केल्याच्या प्रकरणात न्याय मिळविण्यासाठी सर्व पक्ष, समाज व संघटना आणि एकत्र येऊन आंदोलन करणार आहेत. या आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी सोमवारी (दि.२३) रोजी बीड शहरातील आशिर्वाद लॉन्स येथे सकाळी १० वा. सामूहिक बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. मस्साजोग येथील सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. अतिशय निघृणपणे स्व.देशमुख यांची हत्या करण्यात आली आहे. संपूर्ण जिल्ह्यात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तब्बल १४ दिवस उलटूनही स्व.देशमुख यांचे मारेकरी आणि या प्रकरणाचा सुत्रधार अद्याप मोकाट आहेत. इतके गंभीर प्रकरण असताना प्रशासनाकडून आरोपींच्या अटकेत चालढकल केली जाते आहे. आरोपी हे सत्तेच्या राजाश्रयात असल्याने त्यांना अटक केली जात नाही. सत्तेचा इतका दुरूपयोग जनसामान्यांना घातक ठरत चालला आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्वपक्षीय आणि सर्व विचारांचे लोक एकत्र येऊन सर्वसमावेशक आंदोलन उभे करणार आहेत. दरम्यान या आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी आयोजित केलेल्या सामूहिक बैठकीला सर्व पक्ष, संघटना आणि सर्वच विचारांच्या लोकांनी उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# जिल्ह्यातील जनतेच्या सुरक्षेसाठी मी २४ तास तत्पर-एसपी नवनीत काँवत

बीड, (प्रतिनिधी) :- बीड पोलिस अधीक्षक म्हणून आयपीएस नवनीत काँवत यांची शनिवारी नियुक्ती केली आहे. त्यानुसार नवनीत कॉवत यांनी शनिवारी रात्री पावणे आकरा वाजता पोलिस अधीक्षक पदाचा पदभार स्विकारून कामाला सुरूवात केली आहे. रविवारी सकाळी त्यांनी पोलिस प्रशासनातील वरिष्ठ अधिकार्यांची बैठक घेवून जिल्ह्याचा आढावा घेत त्यांना अनेक सुचनाही केल्या आहेत. या बैठकीनंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधून आपली भुमिका प्रसारमाध्यमांसमोर मांडली आहे. जिल्ह्यातील जनतेच्या सुरक्षेसाठी मी २४ तास तत्पर राहणार असून प्रत्येकाला सुरक्षीत वाटले पाहिजे असेच काम करणार असल्याचे यावेळी त्यांनी बोलून दाखविले आहे. त्याअनुषंगाने ते उद्या जिल्ह्यातील ठाणेदारांची बैठक घेवून त्यांनाही पुढील कामासंदर्भात अनेक सुचना देणार आहेत. नवनीत काँवत यांनी यापुर्वी लोणावळा येथे डीवायएसपी, धाराशिव येथे अप्पर पोलिस अधीक्षक तर छ.संभाजीनगर येथे पोलिस उपायुक्त म्हणून कर्तव्य बजावलेले आहे. पोलिस अधीक्षक म्हणून त्यांची बीड जिल्ह्यातील ही पहिलीच पोस्टींग आहे. त्यानुसार त्यांनी पोलिस अधीक्षक पदाचा पदभार स्विकारून कामाला प्रत्यक्ष सुरवात केली आहे. रविवारी सकाळी त्यांनी पत्रकार परिषद घेवून आपली भुमिका स्पष्ट केली आहे. जिल्ह्यातील जनतेच्या सुरक्षेसाठी मी २४ तास तत्पर राहणार असून ▶▶पान २ वर



## जि.प.शिक्षकाला भरधाव बसने उडवले

# शिक्षकाचा जागीच मृत्यु

उमापूर, (प्रतिनिधी):-भरधाव एसटी बसने दुचाकीला जोराची धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील ४५ वर्षीय जिल्हा परिषद शिक्षकाचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात एवढा भीषण होता की, दुचाकीसह शिक्षकाला बसने जवळपास दोनशे फूट फरफटत नेले होते. ही घटना गेवराई-शेवगाव रस्त्यावरील महारटाकळी येथे रविवारी (दि.२२) सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास घडली. फय्याज खान ( वय ४५ रा.महारटाकळी ता.गेवराई) असे अपघातात मृत्यू झालेल्या शिक्षकाचे नाव आहे.



फय्याज खान हे तालुक्यातीलच अर्धपिंपरी याठिकाणी जिल्हा परिषद शाळेवर कार्यरत होते. ते आपल्या गावालगत असलेल्या क्रिकेट मैदानावर रोज सकाळी क्रिकेट खेळण्यासाठी जात होते. दरम्यान रविवारी क्रिकेट खेळून फय्याज खान हे सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास घराकडे परतत असताना समोरून भरधाव वेगाने आलेल्या माजलगाव-पुणे या बसने (एम.एच.१३ सी.यू.७८३६) त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. हा अपघात ऐवढा भिषण होता की, ▶▶पान २ वर

# पोलिसांनी काळया फिल्म लावलेल्या गाड्यांवर कठोर कारवाई करावी

## एसपींनी गुन्हेगारी रोखावी-ॲड.अजित देशमुख




बीड, (प्रतिनिधी) बीड जिल्ह्यात गुंडगिरी फोफावत आहे. या गुंडगिरीतून अनेक गुन्हे घडत आहेत.पोलिसांनी काळया फिल्म लावलेल्या काचा असलेल्या गाड्यांवर कठोर कारवाई करावी. गुंडगिरीतून अनेक गुन्हे घडत आहेत आणि अनेकांचे बळी जात आहेत. त्यामुळे एस. पी. नवनीत कावत यांनी याबाबत त्वरित आदेश द्यावेत. गुन्हेगारीवर रोख आणावी, असे आवाहन जेष्ठ समाज सेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी केले आहे. जिल्ह्यातील गुन्हेगार पोलिसांना माहीत आहेत. याच सलोख्याने वाळू माफिया, गुटखा माफिया, खंडणीखोर, बोगसगिरी करणारे जन्म घेत आहेत. हे सर्व गुन्हेगार काळया काचाच्या गाडीतून फिरतात. डिजिटल नंबर प्लेट गाड्यांना लावतात. त्यामुळे पोलिसांनी बेकायदेशीर रीतीने चालणाऱ्या या गाड्यांवर कठोर कारवाई करावी. ▶▶पान २ वर

# नवरख्यांना खमकी खाती

## फडणवीसांच्या पंचांगात दिग्गजांना राहू,केतू आणि शनि

**क्रॉसलाईन**

काल देवदंर यांची किर्द उघडली तेव्हा जबरी खाती अगदी नव्या चेहऱ्यांना देऊन फडणवीस यांनी येणाऱ्या काळात कुणी स्पर्धक राहू नये याची काळजी घेतली. लोकसंपर्क असलेली लोकनेते सत्तेच्या पर्यावरनात केवळ फूलपाखरा एवढे अधिकार ठेऊन असतील. दिल्लीकडे जुगाड लाऊन आलेल्या पंकजा खाते वाटपात मात्र सुमार ठरल्य , छगन भुजबळ सारखे ओबीसी खमके अगदी पटावर ठेवलेच नाहीत, मोठी आसामी आणि दानंत असलेले तानाजी सावंत यांचा सत्तेच्या कड्यावर दोर तुटला, अब्दुल सत्तार यांचा शेखचिल्लि केला, धनंजय मुंडे यांना मात्र अन्न देऊन केवळ मंत्री ठेवले. तुम्ही म्हणाल सावंत सत्तार हे तर शिंदे सेनेचे, देवेंद्र फडणवीस यांचा डाव हाच आहे ते केवळ भाजप अंतर्गत स्पर्धकांना जागा दाखवत नाहीत तर मित्र पक्ष आणि त्यातले मित्र देखील कसे मर्यादेत राहतील याची काळजी घेतात, स्वपक्षाच्या पंकजा मुंडे यांना हा हवामान बदल समजला नसेल का, कधी काळी ग्रामविकास आणि महिला बाल कल्याण सारखी कल्याण करणारी खाती व २५/१५ चे लाभार्थी दारात उभी करणारी सदर आता जयकुमार गोरे सारख्या फ्रेमच्या बाहेरच्या माणसाला गेलीत आणि ताईकडे पर्यावरण. सत्तेचे रडार असे देखील फिरते हे दाखवून दिले, अजित पवार यांच्याकडे तिजोरीच्या चाव्या सोडल्या तर मंत्री मंडळ यादी वाचली तर त्यांच्या पक्षाला फारसा अर्थ दिसत नाही. या तुलनेत शिंदेकडून डाव साधला गेलाय, नगर विकास, सामाजिक न्याय शिरसाट, शालेय शिक्षण दादा भुसे, उद्योग उदय सामंत, पर्यटन खान शंभू राजे, रोजगार गोगवले यांच्याकडे, ( पाल पानी वाले ) बाकी दादाच्या पक्षात अन्न नावाचे दोन एक मुंडे व दुसरे झिरवळ, क्रीडा व कामगार सारखे फेस ना पानी असलेले खाते, आरोग्य खाते ज्यात प्रतिमा कमावली जाऊ शकते ते खाते देखील चर्चेत नसलेले प्रकाश आबीटकर यांना देऊन देवेंद्र यांनी सत्तेचे केंद्र केवळ आपणच कसे राहू याची तजवीज केली आहे. गृह ऊर्जा बांधकाम ▶▶पान २ वर



# सरपंच खून प्रकरणी विशेष वकील म्हणून बाळासाहेब कोल्हे यांची नियुक्ती!



बीड, (प्रतिनिधी):-मसाजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची दिवसाढवळ्या अपहरण व हत्या करण्यात आली होती. यामुळे बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रात एकच खळबळ उडाली. देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी व मास्टरमाइंड यांना अटक करण्यात यावी अशी मागणी लोकसभा,विधानसभेत केली होती. तसेच या हत्येचा ▶▶पान २ वर



# 'बुडती' हे जन



गेल्या आठवड्यात मुंबईत एका 'बेस्ट' बसने नऊ-दहा जणांना चिरडले आणि बुधवारी एक फेरीबोट बुडून १३ जणांचे प्राण गेले. 'बेस्ट' बसच्या चालकास वाहनाचा वेग आवरता आला नाही आणि स्पीड बोटीच्या चालकासही बोटीचा वेग झेपला नाही. एक अपघात रस्त्यावरचा आणि दुसरा समुद्रातला. दोन्हींमागचे कारण तेच. वेग. बेस्ट बसचा चालक शिकाऊ होता तर स्पीड बोटचे इंजिन तसे होते. अलीकडे 'बेस्ट' बस ड्रायव्हरची भरती कंत्राटी होते. त्यामुळे त्या बस गाड्यांचे अपघात वाढत असल्याचे सांगितले जाते. पण हा असला शिकाऊपणाचा, कंत्राटी नियुक्त्यांचा आरोप नौदलास लागू होत नाही. तरीही प्रवासी बोटीवर नौदलाची स्पीड बोट आदळली. त्याआधी गेल्याच महिन्यात गोव्यानजीक मासेमारी बोटीवर एक पाणबुडी आपटली. यंदाच्याच जुलै महिन्यात नौदलाच्या 'ब्रह्मपुत्रा' या क्षेपणास्त्र युद्धनौकेवर आग लागली आणि एक खलाशी गेला. काही वर्षांपूर्वी 'सिंधुदुर्ग' नामक युद्धनौकेवरील आगीत दोन नौदल अधिकाऱ्यांचे प्राण गेले. 'सिंधुरक्षक' नावाच्या पाणबुडीवर स्फोट होऊन तब्बल १८ नौसैनिक प्राणास मुकले. याखेरीज व्यापारी बोटी, तटरक्षक दलाच्या नौका इत्यादींत मुंबईच्या समुद्रात झालेले अपघात वेगळे. भारताचे नागरी जीवन अत्यंत बेशिस्त असते आणि त्यात अपघात नवे नसतात. पण नौदलाचे असे नाही. अत्यंत शिस्तबद्धपणे, सर्व नियमकानून यांचे पालन करत चोख प्रशिक्षणानंतर त्यांची भरती होते. तरीही हे इतके अपघात. हा तपशील येथे दिला त्यामागे नौदलाच्या अपघातांचे पाढे वाचणे हा उद्देश नाही. तर भारतीय नागरजीवनाचा गुण नौदलादी संरक्षण सेवांस लागतो की काय, ही भीती. तसे होऊ नये हीच इच्छा प्रत्येक भारतीयाची असेल. असे का म्हणायचे याचे उत्तर गेल्या पाच वर्षांत या महासत्ता वगैरे होणाऱ्या देशाने केवळ अपघातांत किती प्राण गमावले ही संख्या लक्षात घेतल्यास मिळेल. गेल्या पाच वर्षांत या देशात रस्ते अपघातांत तब्बल ७ लाख ७७ हजार ठार झाले. कोणत्याही महायुद्धात नाही, महासाथीत नाही; पण फक्त अपघातांत आपल्याकडे इतके जण गेले. हा तपशील संसदेत नुकताच दिला गेला. त्यामुळे त्याच्या सत्यासत्यतेबाबत शंका घेण्याचे कारण नाही. आणि दुसरे असे की भारतीय रस्त्यांवरील अपघातांची ही संख्या पाहून परदेशात मला लाज वाटते असे म्हणण्याची वेळ आपले महामार्गमंत्री नितीन गडकरी यांच्यावरच आली. म्हणजे आपली याबाबतची कर्तबगारी किती 'अतुलनीय' आहे हे कळावे. देशातल्या सर्वात मोठ्या उद्योग समूहाचा प्रमुख असो वा परदेश विद्याविभूषित शल्यक वा एखादा सामान्य नागरिक. रस्त्यावरच्या अपघातांबाबत आपल्याकडे 'सर्व-वर्ग समभाव' दिसून येतो आणि सगळ्याच वर्गातल्यांना त्याची झळ पोहोचते. ही समानता तशी वाखाणण्याजोगी म्हणायची. हे झाले जिवांचे. पण या जाणाऱ्या जिवांच्या बरोबरीने आर्थिक नुकसानही होत असते. एका आकडेवारीनुसार देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नातील एक ते दीड टक्का आपण केवळ या अपघातांत गमावतो. यात जाणारे वा जायबंदी होणारे हे प्राधान्याने १५ ते ६० या वयोगटांतील असतात. म्हणजे हे तसे कमावते वय. त्याच वयात प्राण जाणे वा कायमचे अपंगत्व येणे हे संबंधित कुटुंबांच्या आर्थिक स्थैर्यास भगदाड पाडणारे असते. म्हणजे तेही आर्थिक नुकसान. शिवाय याच्या जोडीने विमा कंपन्यांस पडणारा भुर्दंड. अलीकडे अशा प्रत्येक अपघातानंतर मृतांच्या नातेवाईकांस पंतप्रधानांपासून ते राज्याच्या मुख्यमंत्र्यांपर्यंत सगळे जण लाखा-लाखांच्या आर्थिक मदतीच्या घोषणा करत असतात. भले अपघात नागरिकांच्याच बेशिस्तीमुळे झालेला असो, तरीही अशा मदतींची घोषणा होते. ती करताना ही मंडळी दानशूरतेचा आव आणत असली तरी प्रत्यक्षात नुकसान होत असते ते कर भरणाऱ्या नागरिकांचे. त्यांनी प्रामाणिकपणे भरलेल्या करांस हे असे फाटे फुटतात. कर्जबुडव्यांनी केलेले नुकसान याच करदात्यांच्या जिवावर भरून काढले जाणार आणि अपघातग्रस्तांच्या नातेवाईकांना देणग्याही यातूनच दिल्या जाणार. अपघातांतील मृतांस अलीकडे किमान पाच लाख रुपयांची तरी मदत दिली जाते. गेल्या पाच वर्षांत यावर किती रक्कम खर्च झाली असेल याचा गुणाकार एकंदर अपघात बळींची संख्या माहीत असल्याने करता येणे अवघड नाही. बेशिस्त, बेदिली आणि बेमुर्वतखोरी ही या अपघातांमागील प्रमुख कारणे. आपण इतके बेशिस्त की प्राणिसंग्रहालयात गेलो की इतके माकडचाळे करणार की पिंजऱ्यातील माकडे शहाणी वाटावीत. माशांना/ पक्ष्यांना फरसाण खायला घालणार आणि स्वत:च्या खादाडीच्या खरकट्या खुणा तशाच मागे सोडणार. रस्त्यांवरून सर्रास 'रॉंग साइड'ने वाहने चालवणार आणि अमुक-तमुक नेत्यामुळे परदेशात आपली प्रतिमा किती उंचावली त्याच्या बाता मारणार. काही गू-घाण घटकांपासून बनवलेल्या पानमसाल्यांचे तोबरे भरून पावलोपावली पिंका टाकणार आणि देश किती प्रगती करतो आहे त्याच्या बतावण्या करणार. सामाजिक शिस्त नाही. इतरांची मते, त्यांचा पैस, त्यांचा शांततेचा अधिकार याबद्दल काडीचीही अक्कल नाही आणि ती पुढील किमान शतकभर तरी येईल अशी लक्षणे नाहीत. 'आधीच मर्कट त्यात मद्या प्याला' या धर्तीवर आधीच हे आपण असे. आणि त्यात हातोहातीच्या मोबाइलचे कॅमेरे. त्यामुळे रील्स आणि सेल्फीची वाढती महासाथ. या तुलनेत करोना-काळ बरा म्हणायचा. त्या विषाणूस रोखण्याची लस तरी होती आणि प्रसंगी माणसांना डांबण्याची सोयही होती. तथापि अक्कलशून्यतेच्या आनुवंशिक व्याधीस रोखणारी लस अद्याप तरी विकसित झालेली नाही, हे आपले दुर्दैव. त्यामुळे घात असो वा अपघात, बारसे असो वा बारावे सेल्फी काढणाऱ्यांची वा रील बनवणाऱ्यांची कमतरता अजिबात नाही. खरे तर आपणास बघावयास, आपण कोणत्या वेळी काय करतो, काय खातो, काय पितो, कोणते कपडे घालतो, इत्यादी जाणून घेण्यात इतरांना रस आहे असे मानण्यास आणि त्यानुसार समाजमाध्यमांवर स्वत:चे सतत अपडेट देण्यास उच्च दर्जाची निर्बुद्धता हवी. ती किती मुबलक आहे हे आसपास सहज नजर टाकली तरी कळावे. प्रसंग कोणताही असो हे सेल्फीत्सुक वा रीलकर्ते तेथे हजर. अशा विसविशीत वातावरणात नागर शिस्त येणार कशी? अशी शिस्त समाजात निर्माण व्हावी यासाठी घराबाहेर पडताना आत्मकेंद्रितता सोडण्याची सवय लहानपणापासूनच अंगात बिंबवावी लागते आणि नियमांचा आदर करणे अंगी बाणवावे लागते. हे कसे होणार? आपल्या सुपुत्र/ सुपुत्रीस शाळेत सोडायला जाणारे त्या पाल्याचे तीर्थरूप वा मातोश्री सर्रास दुचाकी 'रॉंगसाइड'ने रेटत असतील तर या कुलदीपक/ दीपिकांवर वाहतूक नियमांचे कोणते संस्कार झालेले असतील? सामाजिक प्रामाणिकपणा अंगी असेल तर ही अशी अनेक उदाहरणे प्रत्येकांस देता येतील. कारण ती सर्रास आढळतात आणि ती अन्य कोणाची नाही. तर ती आपलीच आहेत. अशा उदाहरणांनी खच्चून भरलेला आपला समाज! तो सुधारावा याची गरजच कोणास नाही. राजकीय सुधारणांआधी सामाजिक सुधारणा हव्यात असे म्हणणारे गोपाळ गणेश एखादेच. बाकी सर्व आमचे आम्ही आणि आपले कर्तृत्व काहीही नाही अशा मुद्द्यांवर गर्व से कहो आरोळ्यांत मशगूल! अशा वातावरणात सामाजिक सुरक्षा वाऱ्यावर सोडली जाऊन अपघातांची संख्या वाढतीच असेल तर त्यात नवल ते काय? तेव्हा; मुंबईलगतच्या समुद्रात बुडणारी बोट पाहून संत तुकारामांचे 'बुडती हे जन / देखवेना डोळा' ही ओळ आठवणेही नवल नाही.

# राज ठाकरे-उद्धव ठाकरे भेटीवर एकनाथ शिंदेच्या शिवसेनेची पहिली प्रतिक्रिया, ''ते दोघं एकत्र.''



मुंबई, (वृत्तसेवा) :- मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे दोघंही आज एकत्र आल्याचं पाहण्यास मिळालं. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येतील का? या चर्चा कायमच सुरु असतात. राज ठाकरे यांनी शिवसेना सोडून नवा पक्ष स्थापन केल्यापासून या चर्चांना सुरुवात झाली आहे. दरम्यान २०१९ मध्ये जेव्हा विधानसभा निवडणूक आली होती तेव्हा राज ठाकरे हे महाविकास आघाडीबरोबर होते. मात्र २०२२ नंतर राज ठाकरे महायुतीबरोबर गेले. आता आज एका कार्यक्रमाच्या निमित्ताने ठाकरे बंधू एकत्र आल्याचं पाहण्यास मिळालं. याबाबत आता एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेने प्रतिक्रिया दिली आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे दोन्ही नेते एका लग्नाच्या निमित्ताने एकत्र आलेले दिसले. या दोघांमध्ये चर्चाही झाली. ती काय होती त्याचा तपशील समजू शकलेला नाही. मात्र आता हे दोन नेते एकत्र आल्याने महापालिका निवडणुकीच्या आधी काही सूत्रं बदलतील का या चर्चांना मुंबईतल्या राजकीय वर्तुळात हे दोन बंधू आणि राजकीय नेते एकत्र येतील अशा चर्चा सुरु झाल्या आहेत. मुंबईतल्या दादर या ठिकाणी असलेल्या राजे शिवाजी महाविद्यालयात लग्नाचं आयोजन करण्यात आलं आहे. त्यासाठी हे दोन्ही नेते सहकुटुंब पोहचल्याचं पाहण्यास मिळालं. राजकीयदृष्ट्या एकमेकांमध्ये शत्रुत्व सुरु असलेले हे दोन नेते एकत्र आल्याने साहजिकच राजकीय वर्तुळात चर्चा सुरु झाल्या. दरम्यान एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे नेते संजय शिरसाट यांनी याबाबत प्रतिक्रिया दिली आहे. मला मंत्रिपद मिळाल्याचा आनंद आहे. एकनाथ शिंदेंची प्रतिमा कॉमन मॅन अशी आहे त्यानुसारच आम्हा सर्वांचं काम करण्याचं ध्येय आहे. मला सामाजिक न्याय खात्याची जबाबदारी देण्यात आली आहे. या खात्यात अनेक आव्हानं आहेत ती आव्हानं पेलण्याचा प्रयत्न मी करणार आहे. आता आमचे दौरेही सुरु होतील. सोमवारी उदय सामंत आणि मी बीड येथील मस्साजोग या ठिकाणी जाणार आहोत. तसंच परभणीचा दौराही आम्ही करणार आहोत. मराठवाड्यात ज्या घटना घडल्या आहेत त्या ठिकाणी आम्ही पोहचून कुटुंबियांची भेट घेणार आहोत. वाढत्या गुन्हेगारीला आळा कसा बसेल याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही याबाबत कणखर भूमिका घेतली आहे असं संजय शिरसाट म्हणाले. यानंतर त्यांनी राज आणि उद्धव ठाकरे भेटीवर भाष्य केलं. राज आणि उद्धव ठाकरे भेटीवर काय म्हणाले संजय शिरसाट? : राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांची लग्नात भेट झाली म्हणून राजकीय वातावरण तापण्याचं काही कारण नाही. जर तसं काही करायचं असतं तर राज ठाकरेंनी विधानसभेच्या वेळी केलं असतं. राज ठाकरेंनी अनेकदा टाळी द्यायचा प्रयत्न केला पण उद्धव ठाकरेंनी हात कायमच मागे घेतला. मला वाटत नाही की हे दोन बंधू म्हणजेच राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे एकत्र येतील. आत्ता तरी ही स्थिती नाही की हे दोघंही एकत्र येतील अशी प्रतिक्रिया संजय शिरसाट यांनी दिली.


# पालकमंत्रिपदांचं वाटप कधी होणार?

## मंत्री शंभूराज देसाईंनी डेडलाईनच संगितली



मुंबई, (वृत्तसेवा):- हिवाळी अधिवेशन पार पडताच गेल्या आठवडाभरापासून रखडलेले मंत्रिमंडळाचे खातेवाटप शनिवारी (२१ डिसेंबर) जाहीर करण्यात आले. ज्या गृह खात्यावरून एकनाथ शिंदे यांनी ताणून धरले होते, ते खाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वत:कडेच ठेवले आहे. हा एक प्रकारे भारतीय जनता पार्टीने शिंदे यांना दिलेला धक्का मानला जात आहे. एकनाथ शिंदे यांच्याकडे नगरविकाससह गृहनिर्माण आणि रस्ते विकास ही महत्त्वाची खाती सोपवण्यात आली आहेत. फडणवीसांच्या मंत्रिमंडळातील ४२ मंत्र्यांना त्यांचे विरोधक गेल्या आठवडाभरापासून बिनखात्याचे मंत्री म्हणून हिणवत होते. अखेर काल या मंत्र्यांना खाती मिळाली आहेत. खातेवाटप झाल्यानंतर लगेचच महायुतीत पालकमंत्री पदावरुन रस्सीखेच सुरू झाल्याचं पाहायला मिळत आहे. शिवसेना शिंदे गटाचे नेते, तथा मंत्री संजय शिरसाट यांनी माध्यमांशी बोलताना छत्रपती संभाजीनगरचा पालकमंत्री मीच असणार, असा मोठा दावा केला आहे. तर, भरत गोगावले म्हणाले, रायगडचं पालकमंत्रिपद मलाच मिळेल. शिरसाट व गोगावले यांच्या वक्तव्यामुळे खातेवाटप जाहीर होत नाही तोच आता महायुतीत पालकमंत्रिपदावरुन रस्सीखेच सुरू झाल्याची चर्चा रंगली आहे. दरम्यान, राज्याचे नवनिर्वाचित पर्यटन मंत्री तथा शिंदे गटातील नेते शंभूराज देसाई यांनी पालकमंत्रिपदावरून महायुतीत कोणतीही रस्सीखेच नसल्याचं स्पष्ट केलं आहे. तसेच शंभूराज देसाई म्हणाले, ''नुकतंच आमचं खातेवाटप पूर्ण झालं आहे. येत्या दोन दिवसांत आम्हाला आमची खाती सुपूर्द केली जातील. त्याचबरोबर काल विधिमंडळाचं अधिवेशन संपलं आहे. आता आमचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार हे त्या दोन दिवसांत मुंबईला जातील. तिथे एकत्र बसून चर्चा करतील. त्या चर्चेवेळी पालकमंत्रीपदांचं वाटप होईल''.

# आता तुमची पुढची भूमिका काय? छगन भुजबळांचं मोठं विधान



मुंबई, (वृत्तसेवा):- महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार १५ डिसेंबर रोजी पार पडला. मंत्रिमंडळात भाजपा, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या काही आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. पण या मंत्रिमंडळातून काही दिग्गज नेत्यांना डावलण्यात आलं. त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते छगन भुजबळ यांनाही डावलण्यात आलं. मंत्रिपदाची संधी न मिळाल्यामुळे छगन भुजबळ हे नाराज आहेत. आज (२२ डिसेंबर) छगन भुजबळ यांची राज्यभरातील ओबीसी नेत्यांबरोबर बैठक पार पडली. या बैठकीनंतर छगन भुजबळ यांनी माध्यमांशी संवाद साधत पुन्हा एकदा अजित पवार यांच्यावर नाराजी व्यक्त केली. तसेच पुढची भूमिका घेण्यासाठी आपण सर्वांशी चर्चा करत असून निर्णय घेण्यासाठी वेळ लागेल, असंही भुजबळ यांनी म्हटलं आहे. ''आज ओबीसी नेत्यांची बैठक झाली. त्या बैठकीनंतर मला त्यांनी सांगितलं की असं कसं होऊ शकतं? तुम्ही राज्याचं ओबीसींचं नेतृत्व करता. ओबीसींच्या प्रश्नांसाठी तुम्ही राज्यात आणि विधानसभेत प्रश्न मांडले. आता तुम्हाला मंत्रिमंडळातून बाहेर ठेवलं, याचा अर्थ यामागे काहीतरी गौडबंगाल आहे. कारण तुम्ही नेहमीच ओबीसींच्या मुद्यांची पाठराखण केली आहे. त्यामुळे आम्हाला भिती वाटते की हे वेगळं काहीतरी आहे. त्यामुळे आम्ही तुमच्याबरोबर आहोत. आता पुढे काय करायचं? ते आपण बसवून ठरवा. असं ओबीसी नेत्यांनी सांगितलं'', असं छगन भुजबळ यांनी म्हटलं.

# लाडक्या बहिणींना आता लवकरच २१०० रुपयांचा हप्ता येणार?



मुंबई, (वृत्तसेवा):-राज्यातील कोट्यवधी महिला या लाडक्या बहीण योजनेचा डिसेंबरचा रखडलेला हप्त्याची अतिशय आतुरतेने वाट पाहत आहेत. लाडकी बहीण योजनेचे पैसे कधी येतील? असा प्रश्न महिलांना सतावत आहेत. विधानसभा निवडणुकीच्या काळात आचारसंहिता असल्याने महिलांना या योजनेचे पैसे मिळाले नाहीत. तसेच महायुतीने दिलेल्या आश्वासनानुसार आता सरकारला लाडक्या बहिणींना दर महिन्याला २१०० रुपयांची आर्थिक मदत द्यावी लागणार आहे. महिलांच्या बँक खात्यात हे लाडक्या बहीण योजनेचे २१०० रुपये कधी येतील? याबाबत अर्थमंत्री अजित पवार यांच्या जवळचे शिलेदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते आनंद परांजपे यांनी महत्त्वाची प्रतिक्रिया दिली आहे. विशेष म्हणजे आनंद परांजपे यांनी यावेळी विविध मुद्द्यांवर सविस्तर भूमिका मांडली आहे. ''उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पुन्हा अर्थ आणि नियोजन खातं मिळालं आहे. त्याचप्रमाणे आदिती तटकरे यांना महिला आणि बालकल्याण खातं मिळालं आहे. महाराष्ट्राचे युती सरकार २१०० रुपये प्रति महिना लाडक्या बहिणींना मानधन करेल, त्याबाबत लवकरात लवकर सकारात्मक निर्णय होईल'', अशी प्रतिक्रिया आनंद परांजपे यांनी दिली. ''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत अत्यंत सविस्तरपणे परभणीचा विषय असेल किंवा बीडचा विषय असेल, यावर उत्तर दिलेलं आहे. विरोधकांना या विषयावर केवळ राजकारण करायचं आहे. सरकार अत्यंत गतिमान आहे'', अशी टीका आनंद परांजपे यांनी केली आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी हे परभणी दौऱ्यावर येणार आहेत.त्यांच्या या दौऱ्यावरही आनंद परांजपे यांनी टीका केली.

पान १ वरून

### नवख्यांना खमकी...

ग्रामविकास महसूल उच शिक्षण जलसंधारण रोजगार उद्योग ओबीसी विकास हे महत्वाची 'खाती' कर कमळात शाबूत ठेवली आहेत . २०२९ साठी भाजप अगदी स्वबळावर दीडशे येतील अशी आखणी मंत्री विस्तारात प्रस्तावित आहे. पंकजा मुंडे, धनंजय मुंडे सारखे नेते सुमार आणि मागच्या रांगेत दिसतील तेव्हा समजेल देवेंद्र फडणवीस यांनी काय साधले आणि काय सांधले आहे. देवेंद्र फडणवीस म्हणजे हसून सर्वांना बोलतील मात्र करणीला न चुकतील. फडणवीस यांनी छत्रपती उदयन भोसले यांना खासदार, शिवेंद्र राजे यांना सार्वजनिक बांधकाम देऊन, राम शिंदे या होळकर वंशज यांना सभापती करून, सर्व महत्वाचे वंशज देखील आपल्या सदरेवर जमवले आहेत. छत्रपती संभाजी राजे यांच्या सोबत देखील त्यांचे खाजगीत सलोख्याचे संबंध असल्याचे अर्थबद्ध झाल्याचे बोलले जाते. एकीकडे ओबीसी डीएनए जुळवून कुठलही सदृढ अपत्य आपल्या रांगेत जन्माला येऊ नये असे नवजात सत्तेने ठाणले आहे, हेच यावरून समजते, म्हणजे ओबीसी मते घेतली ओबीसी भुजबळ मात्र बाजूला, दोन्ही मुंडे प्रचाराच्या शिवळाटात जुंपून वंजारा मते घेतली, आणि खाते वाटपान नावाचे खाती, देवेंद्र फडणवीस यांनी जो डाव टाकला आहे तो उमजायला २०२८ उघडेल आणि तोवर दुसरी घडी तिसऱ्या पर्वाच्या सांज वेळी परत येण्याची मशागत करत असेल, सत्ता स्थापणे सोबत संघटना बांधणीला महत्व देणाऱ्या भाजप आणि देवेंद्र यांची उकल न झालेली विरोधक मंडळी केवळ लाटा गरम तवे शोधत राहतील. कारण फडणवीस ज्या पद्धतीने पेरते होत आहेत त्यावरून ते शुद्ध सत्तेचे सुपीक काढतील अशीच ते पेरणी आहे.

### जिल्हयातील जनतेच्या...

जिल्ह्यातील प्रत्येकाला सुरक्षीत वाटले पाहिजे असेच काम करणार असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी बोलून दाखविला आहे. तसेच कायदा सर्वांसाठी समान आहे. त्यामुळे सर्वांनी नियमाचे, कायद्याचे पालन करणे आवश्यक आहे. कायदा मोडणार्यांवर कडक कारवाई केली जाईल, जिल्ह्यात अवैध धंदे चालू देणार नाही, संरपंच संतोष देशमुखांच्या हत्येमधील फरार आरोपींना लवकरच गजाआड केले जाईल, विशेष म्हणजे याप्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल, आरोपींना कडक शिक्षा होईल त्याअनुषंगाने पुरावे गोळा केले जातील, असाही विश्वास त्यांनी यावेळी बोलून दाखविला आहे. याअनुषंगानेच त्यांनी रविवारी सकाळी पोलिस प्रशासनातील वरिष्ठ अधिकार्यांकडून बीड जिल्ह्याचा आढावा घेत त्यांना सुचना केल्या आहेत. यावेळी अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, डीवायएसपी विश्वाभंर गोल्डे, उमेश कस्तूरे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उस्मान शेख, शितलकुमार बल्लाळ, मारूती खेडकर, शिवाजी बंटेवाड, अशोक मोदीराज, श्री. गात, डीएसबीचे कुलकर्णी यांच्यासह इतर अधिकार्यांची उपस्थिती होती. तर उद्या एसपी बीड जिल्ह्यातील ठाणेदारांची बैठक घेवून त्यांना चोख कर्तव्य बजावण्याच्या सुचना करणार आहेत.

### सरपंच खून प्रकरणी...

तपास विशेष पोलीस महानिरीक्षक पदाच्या अधिकाऱ्यालाच देण्यात यावा अशी देखील मागणी आ.सुरेश धस यांनी केली होती. तसेच या हत्या प्रकरणी विशेष वकीलाची नेमणूक करण्यात यावी अशी देखील मागणी होती, त्यामुळे दिनांक २१ डिसेंबर रोजी 'विशेष लोक अभीयोजक'' म्हणून बाळासाहेब दत्तात्रय कोल्हे यांची विशेष वकील म्हणून नेमणूक करण्यात आली.तसेच विशेष वकील म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या बाळासाहेब कोल्ह यांची फी गृह विभाग करणार आहे. बाळासाहेब कोल्हे याना फौजदारी प्रकरणातील अनुभव,माहिती व अभ्यास असल्याने त्यांनी बऱ्याच आरोपींना शिक्षेस पात्र होईल असे प्रकरणे निकाली लावले त्यामुळे त्यांना विशेष जबाबदारी म्हणून नियुक्त करण्यात आले.असा आदेश अनुभाग अधिकारी,विधी एव न्यायपालिका विभाग प्रमुख वैशाली बोरुडे यांनी काढला आहे.

### जि.प.शिक्षक...

अपघातानंतर बसने दुचाकीसह फय्याज खान यांना जवळपास दोनशे फुट फरफटत नेले होते, असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या अपघातात फय्याज खान या शिक्षकाचा जागीच मृत्यू झाला असून अपघाताची माहिती मिळाल्यानंतर चकलांबा पोलिस घटनास्थळी दाखल झाले होते. अपघातानंतर या रस्त्यावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती. दरम्यान पोलिसांनी पंचनामा करून फय्याज खान यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी चकलांबा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आणण्यात आला होता.

### पोलिसांनी काळ्या फिल्म...

वाहनांवर कारवाई करत असताना ड्रायव्हरचे लायसन देखील निलंबित करावे. गुन्हेगारांमार्फत दहशतीचे वातावरण पसरवले जात असून याला अनेक जण कारणीभूत आहेत. यातून बीड जिल्ह्यात व्यवसाय निमित्त कोणीही येण्यास तयार नाही. जिल्ह्याची मोठ्या प्रमाणात बदनामी होत असून हे कुठेतरी रोखणे गरजेचे आहे. वेगवेगळ्या पद्धतीने पाऊले उचलून जिल्ह्याची बदनामी थांबवण्यासाठी प्रत्येक सुज्ञ नागरिकांने पुढे येणे आवश्यक आहे. मस्साजोग येथे आज भेट दिल्यानंतर जी परिस्थिती तिथे दिसली, त्यावरून विदारक चित्र निर्माण होत असल्याचे दिसत आहे. त्याचबरोबर वाळू माफिया, गुटखा माफिया खंडणीखोर, बोगसगिरी करणारे जन्म घेत आहेत. प्रशासनातील अनेक लोक हप्तेखोरी मुळे या लोकांबरोबर जोडले गेले आहेत. समाजासाठी ही बाब विघातक आहे. हे सर्व रोखण्यासाठी आज समाजातील दक्ष नागरिकांनी पुढे येणे आवश्यक आहे. बीड जिल्हा बिहार झाल्याचे चित्र महाराष्ट्रात निर्माण झाले आहे. येथील गुंडगिरी देखील त्याचप्रमाणे आहे. नवीन एसपी काय करतात, याकडे देखील जनतेचे लक्ष लागले आहे, असेही ॲड. देशमुख यांनी म्हटले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# धमकी देणाऱ्या पवनचक्की ठेकेदाराच्या गुंडांवर कारवाई होणार; तुळजापूरमधील शेतकरी कुटुंबीयांचे आंदोलन मागे

**धाराशिव । प्रतिनिधी**

तुळजापूर येथील पवनचक्की गुंडांच्या दहशती विरोधातील शेतकऱ्यांचं आंदोलन मागे घेण्यात आलं आहे.तुळजापूर येथील बारुळ येथील पवनचक्की मारहाण प्रकरणाची आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्याकडून दखल घेण्यात आली आहे. सहाय्यक पोलीस अधीक्षक गौर हसन आणि आमदार राणा पाटील यांच्या भेटीनंतर शेतकऱ्यांनी त्यांचे आंदोलन मागे घेतलं. यावेळी पवनचक्की गुंडगिरी प्रकरणातील प्रत्येक दोषीवर कारवाई करण्याचे आश्वासन त्यांनी दिलं.

तुळजापूर तालुक्यातील बारुळ येथील पवनचक्की मारहाण प्रकरणातील शेतकरी सचिन ठोंबरे यांचे कुटुंबीय आणि तुळजापूर येथील भाजप पदाधिकारी विशाल रोचकरी यांनी पवनचक्की ठेकेदार यांच्या मनमानी विरोधात तुळजापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ आंदोलनाला बसले होते. तुळजापूरचे आमदार राणाजगजीतसिंह पाटील आणि धाराशिवचे सहाय्यक पोलीस अधीक्षक गौर हसन यांनी आंदोलनस्थळी जात त्यांची भेट घेतली.



संबंधित ठेकेदार आणि दोषींवर कारवाई करण्याच्या आश्वासनानंतर ठोंबरे कुटुंबीयांनी आंदोलन मागे घेतले. पवनचक्की गुंडाच्या दादागिरीमुळे ठोंबरे कुटुंबीयांनी पोलीस संरक्षणाची मागणी केली. त्याबाबत पोलीस विभागाने संरक्षण देण्याचं मान्य केलं. जिल्ह्यामध्ये आपण कुठल्याही प्रकारची गुंडगिरी खपवून घेणार नाहीत. कुठे असा प्रकार घडला असेल तर त्यांनी जिल्हाधिकाऱ्याची जी समिती आहे त्यांच्याकडे लेखी अर्ज करावा. पोलीस अधीक्षकही त्या समितीचे सदस्य आहेत. गुन्हेगारी स्वरूपाच्या तक्रारी असतील तर त्याही समोर आल्या पाहिजे. जिल्ह्यात अनेक ठिकाणी प्रकरण दाबली जातात. आता एक प्रकरण समोर आले आहे त्यामध्ये आपण सक्त कारवाई करत आहोत. अजून कुठे प्रकार घडला असेल तर त्यांनी पोलीस अधीक्षकांकडे लेखी तक्रार द्यावी, असं आवाहन तुळजापूरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले.

**• काय आहे प्रकरण ?**

**तुळजापूरमधील बारुळ येथील एका पवनचक्की कंपनीच्या ठेकेदाराने सचिन ठोंबरे या शेतकऱ्याला गुंडांकरवी मारहाण केली. या ठेकेदाराने करारनाम्यामध्ये असलेल्या जमिनीपेक्षा अधिकच्या जमिनीवर कब्जा केला. त्यावर तोडगा झालेल्या धनादेश वटला नाही. हा प्रकार दोन वेळा घडल्याचं ठोंबरे कुटुंबीयांनी सांगितलं. नंतर या कंपनीच्या ठेकेदाराने सचिन ठोंबरेला मारहाण केली. तसेच कोऱ्या कागदावर त्याच्या भावाच्या सह्या घेतल्याचा आरोपही करण्यात आला. या प्रकरणी ठोंबरे कुटुंबीयांनी आंदोलनाचा मार्ग पत्करला. आता मारहाण करणाऱ्या या कंपनीवर आणि त्याच्या ठेकेदारावर कारवाई करण्यात येईल असं आश्वासन आमदार राणा जगजितसिंह आणि पोलिसांनी दिलं आहे.**

## वाढदिवसादिवशी आईने नवा मोबाईल घेऊन दिला नाही, मिरजमधील १५ वर्षीय विद्यार्थ्याने आयुष्य संपवलं

**मिरज । प्रतिनिधी**

वाढदिवसादिवशी आईने नवीन मोबाइल घेऊन दिला नाही, या किरकोळ कारणावरून मिरज मधील एका १५ वर्षीय विद्यार्थ्याने गळफास लावून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडलीय. विश्वजित रमेश चंदनवाले असे विद्यार्थ्याचे नाव आहे. आईने मोबाईल घेऊन देण्याचा हट्ट पूर्ण न केल्याने त्याने टोकाचा निर्णय घेत आयुष्य संपवलंय. विश्वजित हा एकुलता एक असल्याने चंदनवाले कुटुंबियांवर मोठा आघात झाला. मिरज शहर पोलीसांनी विश्वजितच्या या आत्महत्त्येची नोंद करत तपास सुरू केलाय.




दरम्यान, विश्वजीतच्या आत्महत्येनंतर सायकॉलॉजिकल वेलफेयर असोसिएशनने अठरा वर्षाच्या आतील मुलांच्या मोबाईल आणि इंटरनेट वापरावर राज्य शासनाने बंदी घालण्याची मागणी केली आहे. रिल्स, सोशल मिडिया वर अपडेटच्या खुळापायी आज मोबाईलचा नाद थोरा पासून ते मोठ्या लोकांपर्यंत कसा लागलाय आणि मोबाईल वापराचा कसा अतिरेक होतोय. हे ही हे आपण पाहतोय. मात्र याच मोबाईलच्या नादात अल्पवयीन मुले आपला जीव देखील देत असतील तर हे मोबाईलचे वेड किती वाईट आहे याची कल्पना येते. मात्र मिरजेतील नववीत शिकणारा विश्वजितने आपल्याला नवीन मोबाईल मिळाला नाही म्हणून थेट आत्महत्याचे पाऊल उचलले आहे.

मानसोपचार तज्ज्ञांनी अल्पवयीन मुलांच्या अशा पद्धतीच्या आत्महत्या बाबत फार गांभीर्याने यांना बघणे गरजेचे आहे ,असे मत व्यक्त करण्यात येतेय. शाळा कॉलेजमध्ये मुलांच्या मध्ये चालणाऱ्या रिल्स आणि सोशल मीडिया वरील अपडेट वर ज्यावेळी चर्चा होते त्यावेळी मुलं आपण या चर्चेतून मागे पडतो का? अशी त्यांच्या मनामध्ये भीती उपस्थित होत असते अशा मधूनच आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल ही मुलं उचलताना दिसून येतात. त्यामुळे अठरा वर्षाच्या आतील मुलांना मोबाईल आणि इंटरनेट वापरावर राज्य शासनाने बंदी घालावी, अशी मागणी देखील करण्यात येतेय.

## एन एस एल शुगर्स ने डिस्लरीचे विषारी पाणी पाटात सोडल्याने शेकाप आक्रमक

**शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे काम न थांबवल्यास एन एस एल शुगर्सचे गाळप बंद पाडु: ॲड. नारायण गोले पाटील**

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील धरणाचे पाणी शेतीसाठी सोडण्यात आले असून माजलगाव तालुक्यात उसाच्या पिकाची लागवडीसाठी शेतकरी सज्ज असताना एन एस एल सुगर्स ने ड्रिस्लरी चे विषारी पाणी पाटात सोडल्याने गुरांसह मनुष्याच्या जीवीतास धोका निर्माण झाला असून पिकांचेही नुकसान झाले असून एन एस एल शुगरच्या डिसलरी च्या विषारी पाण्याने उसाचे पीक जळण्याच्या भीतीने तीन दिवसापासून शेतकरी ऊस लागवड करायला तयार नाहीत याबाबत शेकापचे नेते भाई ॲड



नारायण गोले पाटील यांनी प्रत्यक्ष जायमोक्यावर जाऊन पाहणी करून शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्यानंतर कारखाना प्रशासन, उपविभागीय अभियंता शेतचारी अस्तारीकरण यांना एन एस एल शुगरचे विषारी घाण पाणी थांबवल्या शिवाय शेतकऱ्यांना उसाची लागवड करता येणार नाही ही बाब लक्षात घेऊन उपविभागीय अभियंता शेतचारी अस्तारीकरण उपविभाग क्रमांक दहा यांनी तात्काळ एन एस एल शुगर्स कारखान्यावर गुन्हे दाखल करावेत तसेच एन एस एल सुगर्स कारखान्यास अनेक वेळा विनंती करून देखील माजलगाव धरणाच्या पाठात डिसलरीचे विषारी व घाण पाणी सोडणे चालूच ठेवले असून एन एस एल सुगर्स कारखान्याने माजलगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचा विडा उचलला आहे काय.? असा सवाल करत डिसलरी चे विषारी घाण पाणी पाटात सोडणे तात्काळ बंद करावे अन्यथा पशुधना सह मनुष्याच्या जीवित तास धोका निर्माण करणाऱ्या आणि शेतकऱ्यांच्या शेतीच नुकसान करणारा एन एस एल शुगर्स कारखाना बंद करण्याचा इशारा शेकापचे भाई ॲड. नारायण गोले पाटील यांनी निवेदनाद्वारे २२ डिसेंबर रोजी दिला आहे.



*बीड शहरातील सम्राट लॉन्स येथे माजी नगरसेवक सुभाषजी सपकाळ यांचा मुलगा चि.अजिंक्य व नामदेवजी घुमरे यांची मुलगी चि.सौ.कां. साक्षी यांच्या शुभविवाह प्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर व जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांनी उपस्थित राहून त्यांना पुढील वैवाहिक जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी कैलासजी रकटे पाटील,देवरावजी पाटील,दिपक घोडके पाटील व अक्षयजी काळे उपस्थित होते.*

## दलालांची दादागिरी संजय गांधी विभागातील कर्मचाऱ्यास अश्लील जातिवाचक शिवीगाळ गुन्हा दाखल

**माजलगाव । प्रतिनिधी**

तहसिल कार्यालयात हिंदु धर्मातील भिल्ल जातीच्या सहाय्यक महसुल अधिकाऱ्यास तहसिल कार्यालयात विविध विभागात दलाली करणाऱ्या एका व्यक्तीने अश्लील अशलाम्य शिविगाळ तर केलीच पण त्यांच्या जातीचा उल्लेख करुन जातीवाचक शिविगाळ केल्याची घटना घडली असुन पीडीत स. महसुल अधिकारी यांनी शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी नुसार त्या दलला विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या निंदणीय घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार माजलगाव तहसिल कार्यालयात स. महसुल अधिकारी वसंत कर्मा वसावे यांनी माजतगाव शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी नुसार २० डिसेंबर रोजी च्या सकाळी १०:१५ वा. कार्यालयातील संजय गांधी विभागात असतांना दुपारी १:४५ वा. च्या सुमारास निराधार लोकांसाठी दलाल म्हणुन विविध विभागात काम करणारा प्रकरणातील आरोपी नामे विष्णु गणपत गोरे रा. सोन्नाथडी, ता. माजलगाव, जि. बीड संजय गांधी विभागात आला. त्यावेळी कार्यालयात हजर असलेले कर्मचारी अशोक वखरे (कोतवाल), अनिल गायकवाड (महसुल सहाय्यक) व बाहेरील नागरीक बाबासाहेब ज्ञानोबा आगे, महेश इचके तेथे होते आणि वसंत कर्मा वसावे हे दुसऱ्या कैबिन मध्ये कामात व्यस्त होते. यानंतर वसंत वसावे यांना विष्णु गोरे म्हणाला कि गोसाव्या, आदिवासी जातीच्या अशी जातीवाचक शिविगाळ करून शासकीय कामात अडथळा आणला. अश्या फिर्याद वरुन उल्लेखित नामे आरोपी विरोधात भा .न्या.स २०२३ चे कलम १३२,३५१(२) सह अनु. जाती/जमाती वर अत्याचार प्रतिबंधात्मक कलम ३(१),(आर), ३ (१), (एम), ३(२), (हिए) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढिल तपास पोनि. राहुल कामाजी सुर्यतळ करत आहेत



*मा. मंत्री पंकजाताई मुंडे यांचे नागपूर या ठिकाणी स्वागत करताना नवनाथ शिराळे पाटील जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख इत्यादी पदाधिकारी हजर होते.*

## मंत्री उदय सामंत, संजय सिरसाट आज मस्साजोगमध्ये येणार

**सरपंच संतोष देशमुख कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेणार**



**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत निर्दयीपणे हत्या करण्यात आली. या घटनेचे पडसाद राज्यभर उमटले. दरम्यान मंगळवारी (दि.२३ डिसेंबर) सकाळी दहा वाजता राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत आणि सामाजिक न्यायमंत्री संजय सिरसाट हे मस्साजोग येथे दाखल होणार असून देशमुख कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेणार आहेत अशी माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी दिली.

संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचे राज्यासह हिवाळी अधिवेशनातही पडसाद उमटले. या प्रकरणातील काही आरोपींना अटक करण्यात आले असून काही फरार आहेत. हिवाळी अधिवेशानंतर आज मंगळवारी (दि.२३) राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत हे रत्नागिरी येथून हेलिकॉप्टरने तर सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट हे छत्रपती संभाजीनगर येथून मोटारीने मस्साजोग येथे सकाळी दहा वाजता येणार आहेत. यानंतर सरपंच संतोष देशमुख यांच्या पिडीत कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन करणार आहेत, अशी माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी दिली.

## कार मागे घेत असताना धडक बसल्याने ४ वर्षीय चिमुकल्याने जीव गमावला

**मुंबई । प्रतिनिधी**

कार मागे घेत असताना धडक बसल्याने ४ वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू झाल्याची घटना घडलीये. मुंबईतल्या वडाळा येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर कॉलेज येथे एका कारने ४ वर्षाच्या मुलाचा अपघात झालाय. कार मागे घेत असताना दिली चिमुकल्याला धडक बसल्याने त्याचा जागीच मृत्यू झालाय. या प्रकरणी कार चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटक करण्यात आली आहे.

कार चालक संदीप गोळेला पोलिसांकडून अटक

याबाबत अधिकची माहिती अशी की, मुंबईच्या वडाळा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज जवळ एका कार चालकाने गाडी मागे घेत असताना ४ वर्षीय चिमुकल्याला धडक दिली आहे. यातच त्याचा मृत्यू झालाय. दरम्यान, या प्रकरणी चालक संदीप गोळेला पोलिसांकडून अटक




करण्यात आली असून त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आयुष लक्ष्मण किनवाडे असं अपघातात मृत्यू झालेल्या मुलाचं नाव आहे. किनवाडे परिवार वडाळा ब्रिजवर असलेल्या झोपडीत वास्तव्यास आहे.

इंदापुरात डाळज जवळ रुग्णवाहिकेला अपघात, स्टेअरींग रॉड तुटल्याने रुग्णवाहिका पलटली

इंदापूर तालुक्यातील डाळज नंबर एकच्या पूलाजवळ पुण्यातील ससून रुग्णालयातून नांदेडकडे डेड बॉडी घेऊन निघालेल्या रुग्णवाहिकेला अपघात झालाय. यात चार वाहनांचे मोठे नुकसान झालेय. रात्री साडेबाराच्या सुमारास हा अपघात घडला आहे..या रुग्णवाहिकेत चालकासह सात प्रवासी होते सुदैवाने कोणालाही गंभीर इजा झाली नाही. मिळालेल्या माहितीनुसार हे सर्वजन पुणे येथील ससून हॉस्पिटल या ठिकाणाहून नांदेड या ठिकाणी म्बुलन्स मधून डेड बॉडी घेऊन निघाले होते. रुग्णवाहिकेचा स्टेरिंग रोड तुटला गेला.त्यामुळे ती रस्ता ओलांडून सोलापूर पुणे लेन वर येऊन पलटी झाली. त्यामध्ये चार गाड्यांचे नुकसान झाले आहे.

## कडाक्याच्या थंडीने गुरं कुडकुडायला लागली, अहिल्यानगरच्या शेतकऱ्याने गोठ्यात हॅलोजन लावले; पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांचा महत्त्वाचा सल्ला

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यात सध्या थंडीची लाट अनुभवायला मिळत असून जिल्ह्यात मागील दहा दिवसांपासून तापमानाचा पारा दहा अंशाखाली घसरला असल्याचं दिसत आहे. त्यामुळे वातावरणामध्ये थंडीचा कडाका वाढलेला आहे. थंडीपासून बचाव होण्यासाठी नागरिक उबदार कपड्यांचा वापर करत आहे. परंतु, दुसरीकडे पाळीव जनावरांचे थंडीपासून संरक्षण व्हावे यासाठी पशुपालक देखील विविध उपाय योजना करताना पाहायला मिळतंय.

अहिल्यानगर शहरात जवळच असलेल्या जगदीश भोसले या दूध उत्पादकाने आपल्या गोठ्यातील जनावरांचे थंडीपासून संरक्षण व्हावे यासाठी गोठ्यामध्ये पोल्ट्री फार्ममध्ये वापरण्यात येणारे दीडशे व्हॅटचे चार हॅलोजन लाईट लावले आहेत. हॅलोजनच्या पडणाऱ्या उष्णतेने जनावरांना ऊब मिळत असून जनावरांचे थंडीपासून संरक्षण होत आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये १६ लाख गाय आणि म्हैसवर्गीय जनावरे आहेत तर सुमारे १५



लाख एवढ्या शेळी आणि मेंढ्या आहेत. हिवाळ्यामध्ये जनावरांना हायपोथेरमिया म्हणजेच जनावरांचे तापमान कमी होतं. मुख्यतः हा धोका वासरांमध्ये, शेळ्यांच्या करडांमध्ये होत असतो. जनावरांना प्रामुख्याने हायपोथेरमिया होऊ नये यासाठी कोरडा चारा जनावरांना द्यावा. जनावरांना हिरवा चारा देणे टाळावे. त्याचबरोबर पशुखाद्याम ध्ये गहु, मका यांचे प्रमाण जास्तीत जास्त असलेले पशुखाद्य जनावरांना द्यावे. हिवाळ्यामध्ये पाणी जास्त थंड असल्याने जनावरांना ती पाजल्याने ते पचवण्यासाठी त्यांची ऊर्जा जास्त खर्च होतो. यासाठी जनावरांना पिण्यासाठी कोमट पाणी दिल पाहिजे. त्यानंतर जनावरांचा गोठा हा सदैव कोरडा राहील याकडे जास्त लक्ष दिलं पाहिजे, असं पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. तुंबारे यांनी म्हटले आहे.

दरम्यान, राज्यात सध्या सर्वाधिक निच्चांकी तापमानाची नोंद धुळे येथे करण्यात आली आहे. धुळ्याचे तापमान ४.३ अंशांवर पोहोचले आहे. तर, परभणी, निफाज, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर येथेही थंडीचा कडाका आणखी वाढणार असल्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. पुढील काही दिवस पाकिस्तान आणि अफगाणिस्तानातील कोरड्या वाऱ्यांचा झोत अधिकाधिक वेगानं महाराष्ट्राच्या दिशेनं झेपावत राहिल्यास राज्यावर हाडं गोठवणाऱ्या थंडीची पकड आणखी मजबूत होणार आहे, उत्तर महाराष्ट्र यामुळं सर्वाधिक प्रभावित क्षेत्र असेल. तर, राज्याच्या उर्वरित भागात मात्र थंडीपासून काहीसा दिलासा मिळणार आहे.

# निराधारांना मिळणार संजय गांधी, श्रावणबाळ योजनेचा लाभ

## आ.संदीप क्षीरसागरांच्या पाठपुराव्याला यश

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील अनेक निराधारांना संजय गांधी, श्रावणबाळ योजनेच्या माध्यमातून आधार मिळणार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या योजनांच्या रखडलेल्या मंजुरी अखेर झाल्या असून नवीन लाभार्थ्यांची यादी तयार झाली. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासकीय स्तरावर अनेकवेळा पाठपुरावा केला होता. त्याला आता यश आले आहे.



निराधार वयोवृद्ध नागरिक यांना निर्वाहासाठी निधी देणारी श्रावणबाळ योजना तसेच निराधार व्यक्ती, अंध, अपंग, अनाथ मुले, दिर्घ आजार, घटस्फोटीत स्त्रिया इत्यादी दुर्बल घटकांना आर्थिक मदत पुरवणारी संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि अशाप्रकारच्या इतर योजनांच्या समितीची गेल्या अनेक दिवसांपासून बैठक झाली नव्हती, त्यामुळे गोरगरीब आणि गरजू या योजनांच्या लाभापासून वंचित होते. बऱ्याच दिवसांपासून प्रस्ताव आणि अर्ज दाखल करून देखील लोकांना लाभासाठी प्रतिक्षा करावी लागत होती. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासकीय स्तरावर अनेकवेळा पाठपुरावा करून, बैठका घेऊन संबंधित यंत्रणा व योजना समितीच्या बैठका घेऊन नवीन पात्र लाभार्थी यादीत समाविष्ट करून पात्र आणि गरजूंना लाभ देण्यासाठी निर्देशीत केले होते. यावर आता श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेंतर्गत बीड तालुक्यातील ग्रामीण भागातून असलेल्या १२९ व शहरातील ९७ नवीन लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. यासोबतच संजय गांधी निराधार पेन्शन योजनेंतर्गत शहरातील ७६ व ग्रामीण भागातील ११२ पात्र आणि गरजू लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. तहसिलदार यांच्या नेतृत्वाखाली सदरील योजनांची बैठक होऊन नवीन लाभार्थींचा योजनेच्या यादीत सामावेश केला गेला आहे. त्यामुळे अनेक दिवसांपासून वंचित असलेल्या गोरगरीब, निराधार, दुर्बल घटकांना आ.संदीप क्षीरसागरांच्या माध्यमातून मोठा दिलासा मिळाला आहे. दरम्यान ज्या लाभार्थ्यांचे अर्ज त्रुटीत पडले आहेत, त्यांनी लवकरात लवकर त्रुटीपूर्तता करावी असे आवाहनही आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

## महादेवनगरी वेळापूरात साजरा होणारा मंदीरसंस्कृति उपासक गुरव पितृस्मृती सोहळा

**वेळापूर । प्रतिनिधी**

राज्यांतील मंदीर सांस्कृतीक गुरव समाजातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या धार्मिक सामजिक संस्कृति अध्यतमिक आणि उद्योग क्षेत्रांतील मान्यवर व्यक्तीमत्वानचा एक अभिनव असा सन्मान गुरव पितृस्मृती सोहळा सोलापूर जिल्ह्यातील महादेवाची नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तिर्थ नगरी वेळापूर येथे बुधवार साजरा होत असून या सोहळ्या करीता राज्यांतील गुरव समाज एकत्र होत असून अखिल महाराष्ट्र मध्यवर्तीगुरव परिषद सोलापूर, आणि तमाम मंदीर उपासक गुरव संघटना संस्था सहभाग घेत असल्याची माहिती आयोजक प्रतापराव गुरव यांनी दिली आयोजित पत्रकार परिषदेत दिली आहे.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक डॉ बाबुराव गुरव, माजी महापौर विनायक पांडे , प्रसिध्द ज्योतिष तज्ञ प्रवीण राजगुरू, दिग्दर्शक पत्रकार विजयकुमार हरिश्चंद्रे मनपा पारितोषक वितरण उपजिल्हा अधिकारी, मुख्याधिकारी पुणे प्रमूख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून या महासोहळ्याचे अयोजन प्रताप गुरव महादेव गुरव गौरीहर गुरव यांनी केले आहे.



*प्रदेशाध्यक्ष तथा महसूल मंत्री बावनकुळे यांचा सत्कार करून शुभेछा देताना जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख , जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ आण्णा शिराळे, संदीप नागरगोजे, किरणजी काळे इत्यादी.*

## ग्रामीण विद्यालयात विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन बाल वैज्ञानिकांनी केले विविध प्रयोग सादर

**नेकनूर । प्रतिनिधी**

येथील ग्रामीण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आंतरशालेय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले . यावेळी बहुसंख्य विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला . या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव ॲड . जगदीशरावजी शिंदे साहेब हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणाधिकारी पंचगल्हे हे उपस्थित होते .अध्यक्ष जगदीशराव शिंदे प्रमुख पाहुणे मा पंचगल्हे यांनी सुरवातीस फीत कापून प्रदर्शनाचे उद्घाटन केले नंतर विद्यालयातील सर्व सहभागी विद्यार्थ्यांच्या प्रयोगाची पाहणी केली आणि कौतुक केले .यावेळी त्यांचा सत्कार शाळेच्या वतीने श्रीमती कदम के.के. श्री रुचके आर .के .यांनी केला पंचगल्हे साहेब बोलताना म्हणाले कि , अशा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाप्रती जागरूकता निर्माण होऊन आधुनिक वैज्ञानिक तयार होतील यात शंका नाही . या विज्ञान प्रदर्शनात विद्यालयातील एकूण ३५ विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे प्रयोग सादर केले. विविध विषय , त्यांची मांडणी आणि त्यांचे विवेचनाद्वारे बाल वैज्ञानिकांनी प्रयोगाची माहिती सांगितली . त्यामुळे वैज्ञानिक वातावरण तयार झाले होते . हे बाल वैज्ञानिक इंग्रजी, मराठी आणि हिंदी या भाषेमधून आपल्या प्रयोगाची माहिती सांगत होते.



## कड्यात दोन मित्रांचा तीनच दिवसांच्या फरकाने निधन

**कडा । प्रतिनिधी**

कडा येथिल रहिवासी सुभाष तारू वय ८५ वर्ष आणि त्यांचे मित्र अब्दुल रज्जाक उर्फ बब्बु टेलर वय ८५ वर्ष हे दोघेही एकमेकांचे अगदी लहानपणापासून चे जिवलग मित्र होते.कडा येथील अब्दुल रज्जाक उर्फ बब्बु टेलर यांचे निधन सोमवार दि.१६ डिसेंबर रोजी झाले. त्यानंतर लगेचच गुरूवार दि.२० डिसेंबर रोजी सुभाष तारू यांचे निधन झाले. फक्त तीनच दिवसांच्या अंतराने या दोन्ही मित्रांनी जगाचा निरोप घेतला. सुभाष तारू यांचा फुटाणे विक्री चा व्यवसाय होता तर अब्दुल रज्जाक हे टेलर होते.दोघां मित्रांनी आप आपल्या व्यवसायात यशस्वी होऊन खूप मेहनितीने नाव कमविले. हे दोघेही मित्र कडा येथील बाराभाई गल्लीत रहात होते. सुभाष तारू यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले भास्कर तारू, सुधाकर तारू,एक मुलगी,जावई सुना नातवंडे असा परिवार आहे.तर अब्दुल रज्जाक यांच्या पश्चात पत्नी,तिन मुले एकबाल सय्यद,लतिफ सय्यद,शाकेर सय्यद,एक मुलगी,जावई सुना नातवंडे असा परिवार आहे.काल गुरुवारी सुभाष तारू यांची निधनाची वार्ता कळली तेव्हा गावातील जूनी मंडळी व बाराभाई गल्लीतील लोकांची एकच चर्चा दोन्ही जिवलग मित्र एका पाठोपाठ गेले. लहानपणा पासून ते म्हतारपणापर्यत चा दोस्तांना जग सोडताना हि तसाच राहिला दोघेही एकमेकांचे मागे, गेले काय दोस्तांना म्हणयाचा या दोघांचा अशी चर्चा होत आहे. या दोघां मित्रांना भावपूर्ण श्रद्धांजली.

## राजर्षी शाहू कन्या विद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ बीड संचलित राजर्षी शाहू कन्या माध्यमिक विद्यालयाने उत्कृष्ट नियोजन करून दिनांक १४/१२/२०२४ ते दिनांक १८/१२/२०२४ या कालावधीत विद्यालयाची शैक्षणिक सहल संपन्न झाली.या सहलीसाठी ८० विद्यार्थिनींना घेऊन बीड-नगर-पुणे-पनवेल- मुंबई -गेट वे ऑफ इंडिया- राणीचा बाग- नेहरू तारांगण- मरीन ड्राईव्ह- हाजी अली दर्गा- वानखेडे स्टेडियम- मलबार हिल- विधान भवन -मंत्रालय- महालक्ष्मी मंदिर- अलिबाग- काशीद बीच- जंजिरा- महाड -रायगड- पोलादपूर- प्रतापगड -महाबळेश्वर -वाई- प्रतिबालाजी- जेजुरी-मोरगाव गणपती- जामखेड -बीड यासारख्या ऐतिहासिक,भौगोलिक ,सागरी, सांस्कृतिक ,पर्यावरणीय व धार्मिक स्थळांना भेटी देऊन विद्यार्थिनींना त्या विषयाचे महत्त्व सांगण्यात आले. यामध्ये विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीम. कदम एस.डी यांच्या मार्गदर्शनाखाली सहल प्रमुख श्री.जगताप एस .सी, झोडगे जी .एस व मुंडे एल . आर,सोंडगे के. बी , मातकर व्हि.डि,आगलावे एम. एच,श्रीम. नन्नवरे मॅडम यांनी सहकार्य केले. या सहलीच्या यशस्वीतेबद्दल संस्थेचे अध्यक्ष इंजि. बलभीमराव जाहेर पाटील ,संस्थेचे सचिव प्रा.जे .पी शेळके यांच्यासह संस्थेचे सर्व संचालक मंडळ तसेच प्राथमिक विभागाचे प्र.मुख्याध्यापक राऊत आर. टी, राजमाता इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या श्रीम.लोखंडे आर.डी यांनी अभिनंदन केले.



## तीर्थक्षेत्र पंढरपूर येथे श्रीमद् भागवत कथा व तुळशी पूजा नाम यज्ञ सोहळा

**बीड । प्रतिनिधी**

मकर संक्रांति महापर्वणी पर्वकाळ निमित्ताने तीर्थक्षेत्र पंढरपूर येथे श्रीमद् भागवत कथा व तुळशी पूजा नाम सप्ताह चे आयोजन करण्यात आलेले आहे. ह भ प ज्योतिषाचार्य बबन देवा महाराज जोशी शिरस मार्गकर यांच्या अमृतमय वाणीतून दररोज रात्री ७ ते ९.३० या वेळेत श्रीमद् भागवत कथा व तुळशी पूजा नाम जप यज्ञ नारायणगड मठ पंढरपूर येथे या नाम सप्ताहाचे भव्य दिव्य आयोजन करण्यात आलेले आहे. या नाम सप्ताहामध्ये सकाळी ४ ते ६ काकडा भजन, ११ ते २ तुळशी अर्चना पूजा २ ते ५संगीत भजन ६ वाजता हरिपाठ व सायंकाळी ७ ते ९ या वेळेमध्ये श्रीमद भागवत कथा संपन्न होणार आहे. भागवत कथेचा शुभारंभ दिनांक ८ /१/ २०२५ बुधवारी दुपारी पंढरपुर नगर प्रदक्षिणा करून भव्य दिव्य स्वरूपातभागवत कथा आरंभ होणार आहे . पावित्र तीर्थ पंढरपुरी येथे भागवत कथा श्रवण करण्यचा लाभ भाविक भक्तांनी घ्यावा.




### अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय राजमार्ग क्रमांक ५४८ डी मार्गावर गतिरोधक असतिल तर एचसीपीएल कंपनीला लिंबागणेश येथे गतिरोधक बसविण्यात अडचण काय?

## जिल्हा प्रशासनाची दिशाभूल, लिंबागणेशकरांच्या आंदोलनाचा ईशारा : डॉ.गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय राज्यमार्ग क्रमांक ५४८ डी महामार्गावरील येळंबघाट येथे ग्रामस्थांच्या मागणीवरून गतिरोधक बसविण्यात आलेले आहेत. मात्र याच मार्गावर लिंबागणेश येथील बसस्थानक आणि भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयासमोर सुरक्षिततेसाठी गतिरोधक बसविण्यास एचसीपीएल कंपनीला काय अडचण आहे असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर व हरिओम क्षीरसागर यांनी विचारला आहे.



अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय राज्यमार्ग क्रमांक ५४८ डी मार्गावरील लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात १००० पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या असुन शाळेचे मुख्य प्रवेशद्वार अगदी महामार्गाला लागुनच असल्याने शाळा भरताना आणि शाळा सुटल्यानंतर गर्दी असते.याठिकाणी यापूर्वी सुद्धा वारंवार अपघाताच्या घटना घडलेल्या असुन या अपघात प्रवण क्षेत्रात गतिरोधक बसविण्याची मागणी गेल्या २ वर्षांपासून पालकांची असुन डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली २-३ वेळा रास्तारोको आंदोलन करण्यात आलेले आहेत.

**एचसीपीएल कंपनी कडुन प्रशासनाची दिशाभूल : डॉ.गणेश ढवळे**

गेल्यावर्षी दि.४ जानेवारी २०२४ रोजी लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयासमोर गतिरोधक बसविण्यात यावेत या मागणीसाठी डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली तब्बल ३ तास रास्तारोको आंदोलन करण्यात आले होते. तत्कालीन तहसीलदार सुहास हजारे यांनी याची दखल घेत दि.२० फेब्रुवारी २०२४ रोजी तहसिल कार्यालयात बैठक बोलावली होती. तेव्हा म.रा.म.वि.(मर्या) छत्रपती संभाजीनगर अभियंता महेश देशमुख,नायब तहसीलदार प्रशांत सुपेकर, एचसीपीएल कंपनीचे कंत्राटदार यांनी राष्ट्रीय महामार्गावरील गतिरोधक बाबत सडक परीवहन व राजमार्ग मंत्रालय नवी दिल्ली यांच्या दि.२९ आगस्ट २०१६ रोजीच्या पत्रकान्वये महामार्गावरील गतिरोधक बाबत सुचना प्राप्त अनुषंगाने गतिरोधक बसविण्यात येणार नाही असे सांगून प्रशासनाची दिशाभूल केली.मात्र बसस्थानक, शाळा, धोकादायक वळण आदी अपघात प्रवण क्षेत्रात ग्रामस्थांनी मागणी केल्यानंतर बसविण्यात येते. त्याच अनुषंगाने एचपीएम कंपनीने येळंबघाट याठिकाणी गतिरोधक बसविले असुन रात्रीच्या वेळी लांबुन गतिरोधक दिसावेत यासाठी रेडीमेड बसविण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे लिंबागणेश याठिकाणी गतिरोधक बसविण्याची मागणी डॉ.गणेश ढवळे व हरिओम क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी बीड यांना केली आहे.

**लिंबागणेशकर आणि पुन्हा आंदोलनाच्या पावित्र्यात**

जिल्हा प्रशासनाची दिशाभूल करणा-या एचपीसीएल कंपनीकडून जिल्हा प्रशासनाची दिशाभूल करण्यात येत असुन तातडीने लिंबागणेश येथील बसस्थानक, भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आदी अपघात प्रवण क्षेत्रात गतिरोधक न बसवल्यास पुन्हा आंदोलनाचा ईशारा ग्रामस्थांनी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी बीड यांना दिला आहे.